
फिंसैंत फान घो



फिंसैंत फान घो



परिचय

फिंसेंत फान घो याचा जन्म 1853 साली नेदरलँड देशात झाला. तो एका उदार धर्मोपदेशकाचा आणि त्यांच्या दयाळू पत्नीचा थोरला मुलगा होता. फिंसेंतला आपल्या गावची शुद्ध हवा आणि सूर्यप्रकाश खूप आवडत असे. ऋतुंचे बदलते रंग पाहून तो हरखून जात असे. त्यांच्या प्रतिमा त्याच्या मनात घर करून राहात.

वयाच्या सोळाव्या वर्षी फिंसेंत घराबाहेर पडून एका कलाविक्रेत्याकडे काम करू लागला. कामानिमित्त तो पॅरिस आणि लंडन शहरांत फिरला. पण नंतर त्याला, या नोकरीत आपण वेळ फुकट घालवतोय, असं वाटू लागलं. त्याला आपल्या वडिलांसारखंच धर्मोपदेशक बनावसं वाटू लागलं.



प्रार्थना आणि बटाटे



"तुला धर्मोपदेशक बनायचं असेल तर आधी लॅटिन आणि ग्रीक भाषा शिकून घे," शिक्षकांनी फिंसेंतला समजावलं, "मेहनत केली नाहीस तर तू कधीही परीक्षा उत्तीर्ण होऊ शकणार नाहीस."

फिंसेंतने उसासा टाकला. त्याला धार्मिक शिक्षण घेण्यात आनंद मिळत नव्हता. त्यामुळे अभ्यासात तो मागे पडला. "प्रभू येशू शब्दांनी नव्हे, तर त्याच्या चांगल्या कृत्यांमधून बोलला," फिंसेंतने आपलं मत मांडलं, "मला त्याच्यासारखं बनावसं वाटतंय. आपलं आयुष्य दुसऱ्यांसाठी समर्पित करावसं वाटतंय."

वृद्ध शिक्षकांनी मान हलवली, "मला ठाऊक आहे, तुला आयुष्यात चांगलं काही करायचंय. पण इथे तुला आमच्या नियमांचं पालन करावं लागेल, अभ्यास करावा लागेल."

फिंसेंत तिथून निघून गेला. आपला मार्ग योग्य आहे, याची त्याला खात्री होती. त्याला आपलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी थोर विद्वान बनण्याची गरज वाटत नव्हती.

परीक्षेत अपयश आल्यावर त्याने आपल्या आईवडिलांना अभिमान वाटेल असं काही करण्याचा दृढ निश्चय केला.

अखेरीस, त्याला अशी संधी मिळाली.

चर्चने फिंसेंतला बेल्जियमच्या गावांमधल्या खाणींमध्ये प्रवचनं देण्यासाठी पाठवलं. तिथे लोक जमिनीखाली उंदरासारखं सरपटत काम करत किंवा शेतांमध्ये बटाटे उकरून काढत.





फिंसेंतएवढं कष्ट तिथे कुणीही उपसत नसत. फिंसेंत खूप उशीरापर्यंत काम करत असे. जमिनीखाली असुरक्षित वातावरणात व अंधारात काम करणाऱ्या भुकेल्या लोकांना तो आपल्याकडचं सारं काही दान करत असे. त्याने आपलं अन्न, कपडे असं शक्य तितकं त्यांना देऊन टाकलं.

तिथे त्याचे केस अस्ताव्यस्त वाढले. तो बुजगावण्यासारखा दिसू लागला. बऱ्याचदा तो आजारी पडत असे. त्याच्या कुटुंबियांना त्याची काळजी वाटू लागली. "बिचारा फिंसेंत, तो खूप कष्ट करतो. त्याला या स्थितीतून बाहेर कसं काढावं?" त्याची आई उसासे टाकत म्हणत असे.



"मी त्याला पत्र लिहीतो," फिंसेंतचा भाऊ, थिओ म्हणाला, "चित्रांचं जग, ताज्या रंगांचा वास हे सारं त्याला किती आवडायचं! त्याला मी याची आठवण करून देईन."

आणि फिंसेंतच्या स्मृती जाग्या झाल्या. नैराश्येच्या गर्तेतून बाहेर येऊन त्याने जे जे पाहिलं होतं ते ते चित्रित केलं. आणि जसजसं तो चित्रं काढू लागला, तसतसं त्याच्यात त्राण संचारू लागलं.

आपण धर्मोपदेशक नाही तर कलाकार आहोत, असं त्याला वाटू लागलं. फिंसेंतला त्याच्या आयुष्याची दिशा मिळाली. पण हा मार्ग काही सोपा नव्हता.



फिंसेंत बेल्जियममधील खाणकामासाठी ओळखल्या जाणाऱ्या बोरिनेज या जिल्ह्यात राहिला. तेथील खाणमजूर खूप गरीब होते आणि पोट भरण्यासाठी त्यांना अपार कष्ट करावे लागत. स्त्रिया आणि मुलांना आपली घरं उबदार ठेवण्यासाठी कोळशाचे तुकडे शोधावे लागत. गरम बटाटे हेच त्यांचं रोजचं अन्न होतं. नंतर फिंसेंतने *द पोटॅटो इटर्स* (बटाटे खाणारे) नावाच्या चित्रात या भुकेल्या लोकांचं आयुष्य चित्रित केलं.

चित्रकलेची ओळख

फिंसेंतने कलाकार म्हणून यशस्वी होऊन दाखवण्याचा निर्धार केला, "मी भरपूर सराव करेन आणि एक उत्कृष्ट चित्रकार बनून दाखवेन."

पण सराव करण्याआधी त्याला चित्रकलेची बारीकसारीक अंगे शिकावी लागणार होती. "मी देखावा चित्रित करण्यासाठी एक चौकट वापरतोय," त्याने थिओला लिहिलं, "ही चौकट अतिशय उपयुक्त आहे. चौकटीमुळे मी नजिकच्या आणि दूरच्या वस्तू अधिक अचूकपणे दाखवू शकतो. आणि सध्या मी चित्रकार अँटॉन मॉवेकडेही चित्रकला शिकतोय."

पुढल्या काही वर्षांत फिंसेंतने त्याला भुरळ घालणाऱ्या देखाव्यांची चित्रं काढली. हिवाळ्याच्या दिवसांत आभाळाच्या पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या विलो झाडांच्या कृश फांद्या, वेली-गवतापासून बनलेली पक्ष्यांची घरटी, फक्त शिजवलेले बटाटे खाऊन जगणारे अर्धपोटी खाणकामगार......अशी अनेक चित्रं तो काढत गेला.

हळूहळू त्याच्या चित्रांमध्ये सुधारणा होत गेल्या. तो अधिकाधिक शिकण्यासाठी तयार झाला. मग तो चित्रकला शिकण्यासाठी अँटवर्प शहरात गेला. "मी पूर्वीच्या चित्रकारांची चित्रं पाहून शिकेन आणि त्यातून स्वत: उत्तमोत्तम चित्रं काढेन," तो मोठ्या आत्मविश्वासाने म्हणू लागला.



पण पुन्हा ठरवल्याप्रमाणे काही झालं नाही.



"तुला नीट रंगवता येत नाही असं दिसतं," फिंसेंतच्या शिक्षकांनी कुरकुर केली, "तू घाईघाईत चित्र रंगवतोस आणि आमचे नियमसुद्धा पाळत नाहीस."

मग शिक्षकांनी त्याला सावकाशपणे, संयमाने बारीकबारीक गोष्टी कशा रंगवायच्या ते शिकवलं. त्यांनी त्याला दगडांच्या शिल्पांची चित्रं काढायलाही शिकवलं.

"हे बघ," त्यांनी फिंसेंतला एक चित्र दाखवत म्हटलं, "सुंदर मुलायम पृष्ठभाग. फिक्कट गुलाबी रंग. असं रंगवत जा."



"पण मला खरीखुरी माणसं चित्रित करायचीयत," फिंसेंतने त्यांना विरोध दर्शवत म्हटलं, "मला दररोज एक नवीन ताजं चित्र रंगवायचंय. मला बाहेर उन्हात बसून पळणारे ढग आणि चमचमणारं पाणी चित्रित करायचंय."

फिंसेंतच्या अनुपस्थितीत शिक्षकांनी त्याच्या विधानावर नापसंती व्यक्त केली.

"फिंसेंत कधीही चित्रकार बनू शकणार नाही. त्याला खालच्या वर्गात बसवलेलं बरं!" ते म्हणू लागले.

पण तोवर उशीर झाला होता. फिंसेंत आपला बाडबिस्तरा घेऊन पॅरिसला त्याचा भाऊ थिओ, याच्याकडे राहायला गेला.





फिंसेंतनंतर शेकडो वर्षं चित्रकारांनी फिंसेंतच्या चौकटीचा उपयोग केला. फिंसेंतची ही चौकट जणू त्याच्यासाठीच बनली होती. या चौकटीमुळे त्याला चित्रात वस्तू जवळ वा दूर दाखवणं शक्य झालं. पण एखादा देखावा त्याने चौकटीशिवाय चित्रित केला की त्याला जास्त आनंद वाटत असे.

पॅरिसमधील चित्रं

फिंसेंतने दोन वर्षं जगातील काही महान चित्रकारांसोबत काम केलं. तो जॉर्जेस सीराट आणि हेन्री द टुलुस-लुट्रेक यांना भेटला. ते नेहमीच नवनव्या कल्पनांवर काम करायला उत्सुक असत. तेसुद्धा फिंसेंतसारखं आजचा दिवस, आत्ताचा क्षण चित्रित करायला तत्पर असत.

“आता मला नियम मोडायला न घाबरणाऱ्या या जिवंत कलाकारांकडून शिकायला मिळेल,” फिंसेंतला वाटू लागलं.





पॅरिसमध्ये फिरताना फिंसेंतला जपानी चित्रकारांच्या कामाची पद्धत पाहायला मिळाली. त्याला त्यांच्या चित्रांमध्ये मोकळ्या पृष्ठभागावर साधेसरळ आकार ठळकपणे रंगवलेले दिसले.

“त्यांच्या चित्रांमधला रेषांचा प्रवाहीपणा आणि उठावदार नक्षी खूप छान आहे,” फिंसेंत स्वत:शी बडबडला, “ काहीतरी करून बऱ्यापैकी पैसा कमवायला हवा. ही चित्रं खरेदी करायला हवीत.”



आता फिंसेंत चित्र रंगवण्यासाठी उजळ आणि प्रसन्न वाटणारे रंग वापरू लागला. त्याने पवनचक्क्या आणि पॅरिसमधील रहदारी चित्रित केली. जाडसर ब्रश आणि सपाट चाकू वापरून तो चित्रात रंगाचे जाड थर देऊ लागला. “निसर्गात विविध रंगांची एवढी उधळण असताना गुळगुळीत पृष्ठभाग आणि फिक्कट रंगाची गरजच काय?!” तो म्हणे.

पण पुन्हा फिंसेंतला आणखी काही वेगळं करण्याची उर्मी वाटू लागली. तो त्याच्या भावाला म्हणाला, “तुला आता स्वत:चं स्थान निर्माण करण्याची गरज आहे. आणि मलाही आझे पंख पसरायचे आहेत.”



जॉर्जेस सीराट या चित्रकाराने रंगांचे सूक्ष्म ठिपके वापरून चित्रं काढली. टुलुस-लुट्रेक यांनी गायक आणि नर्तक यांची चित्रं काढली तसेच सुरेख भित्तीचित्रं काढली. हे दोन्ही कलाकार “इंप्रेशनिस्ट” (प्रभाववादी) नावाच्या एका गटाशी संबंधीत होते. फिंसेंत फान घोसारख्या प्रभाववादी व्यक्तिलाही मोकळ्या हवेत पटापट चित्रकाम करायला आवडत असे. पहिल्याप्रथम तज्ज्ञ लोक त्याच्या चित्रांना पाहून नाक मुरडत. पण हीच चित्रं आज जगात सर्वात लोकप्रिय आहेत.

अर्ल्समधील सूर्यप्रकाश



दक्षिण फ्रान्समधील अर्ल्स शहरात जात असताना फिंसेंतला आपलं उज्ज्वल भवितव्य दिसू लागलं. ते वसंत ऋतुचे दिवस होते आणि चोहीकडे बाग-बगीच्यांमध्ये फुलांना बहर आला होता.

फिंसेंत आपला ब्रश हातात धरून सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत चित्रं काढू लागला. तेथील सौम्य हवामान आणि स्वच्छ सूर्यप्रकाश त्याला ताजंतवानं करत असे. तो मित्रांना म्हणत असे,“ मला चित्रं काढायला दिवस पुरत नाही. प्रत्येक झाड, त्याची प्रत्येक शाखा, प्रत्येक फळाचं चित्र मला काढायचंय.”

फिंसेंतने अर्ल्समध्ये येताना सोबत जपानी चित्रं आणली होती. त्याने अर्ल्समधील झाडं जपानी चित्रांसारखी रंगवली. मग तो स्वत:शीच म्हणाला, “हे छान झालं. आता ही चित्रं ठळक, उजळ आणि साधीसरळ वाटतात.”

आपले जुने शिक्षक अँटॉन मॉवे यांच्या निधनाच्या बातमीने फिंसेंतला खूप दु:ख झालं. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्याला एक कल्पना सुचली. “अँटॉन यांच्या पत्नीला मी माझं सर्वोत्कृष्ट चित्र पाठवेन. माझं पीच झाडाचं चित्रं जपानी चित्रासारखंच आहे. एक दिवस अँटॉन यांची पत्नी या चित्रामुळे श्रीमंत बनेल,” फिंसेंत स्वत:शी कुजबुजला.



चित्रं काढताकाढता फिंसेंतचा आत्मविश्वास वाढत गेला. पण त्याचा चित्रकलेचा अभ्यास आणि सराव निरंतर सुरू राहिला. संधी मिळाल्यावर फिंसेंत पोस्टमन, सैनिक, कॅफेत राहाणारी काळ्या केसांची महिला या त्याच्या मित्रमंडळींची चित्रे काढत असे. आणि मित्रांकडे वेळ नसेल तर तो स्वत:चंच चित्र काढत बसे.







फळीवर रंग घेताना फिंसेंत स्वप्नं पाहात असे. त्याने एकदा थिओला म्हटलं, “एक ना एक दिवस अर्ल्समध्ये मी चित्रकारांचं एक घराणं निर्माण करेन. पॅरिसमधली माझी जुनी मित्रमंडळी इथे येतील आणि हा माझा दक्षिणेचा स्टुडिओ बनेल. आम्ही सारे एकत्र स्वच्छ सूर्यप्रकाशात चित्रं काढू. एकमेकांना सर्वोत्कृष्ट चित्र काढण्यासाठी प्रेरणा देऊ. मी हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आतुर झालोय.”




जपानी चित्रकला अद्ययावत आणि लोकप्रिय होती. श्रीमंत लोक आपल्या घरांना जपानी अलंकारांनी सजवत असत. फिंसेंतला स्वत:कडील जपानी लाकडी ठशांचा संग्रह अत्यंत प्रिय होता. त्याला त्यांची नक्कल करायला आवडे. त्याने त्याच्या अनेक चित्रांमध्ये पार्श्वभूमीवर अशा ठशांचा वापर केलेला दिसतो.

सूर्यफुलं

उन्हाळ्याच्या दिवसांत सूर्यफुलं आपल्या सोनेरी पाकळ्या पसरवू लागल्या. त्यांनी आपलं मुख सूर्याच्या दिशेने वळवताच फिंसेंतचे डोळे चमकले. त्याला एक कल्पना सुचली.


त्याने थिओला ही कल्पना सांगितली, “मी एका उंच इमारतीत राहातोय. याला मी ‘पिवळं घर’ असं नाव दिलंय. पल गोगे हा चित्रकार माझ्यासारखाच गरीब आहे. त्याला मी माझ्यासोबत राहायला बोलावलं तर आम्ही घरभाडं वाटून घेऊ शकतो. हळूहळू आणखी काही चित्रकार आम्हाला येऊन मिळतील. ही संख्या मग वाढतच राहील.”



उत्तेजित होऊन फिंसेंत आपलं घर सजवू लागला आणि बडबडू लागला, “सूर्यफुलं! मी सूर्यफुलांची चित्र काढायला हवीत. त्यांचा पिवळा रंग जीवनाचा, आनंदाचा आणि उर्जेचा रंग आहे. मी घराच्या भिंतींना या आनंदाच्या फुलांनी रंगवून टाकेन.”

दिवसा फिंसेंत सूर्यफुलांच्या विशाल गुच्छांची चित्रं काढत बसे. रात्री तो अर्ल्समधले झोपाळलेले कॅफे चित्रित करत असे. कॅफेच्या आतील दिव्यांचा उजेड तो उग्र रंगात रंगवत असे. तर बाहेरच्या टेबलांवर ताऱ्यांचा लुकलुकता प्रकाश दाखवत असे.





फिंसेंतने थिओला एकदा लिहिलं, “माझ्या मनात दोन विचार नेहमी संघर्ष करत असतात. कधीकधी मला खूप ओरडावसं आणि किंचाळावसं वाटतं कारण मी खूप गरीब आहे. तर कधी मला आनंदाने गाणं गुणगुणावसं वाटतं कारण जग खूप सुंदर आहे.”

फिंसेंतला आपली चित्रं विकून बऱ्यापैकी पैसा कमवावासं खूप वाटे. काही चित्रं विकून त्याने त्याची कर्ज फेडली. काही चित्रांनी त्याने आपलं घर उजळलं. तर कधीतरी आपलं मोल जगाला कळेल, याची वाट बघत काही चित्रं ढिगाऱ्यात पडून राहिली.



ऑक्टोबरमध्ये फिंसेंतने आपल्या बेडरूमचं चित्र काढलं. बेडरुम कसं असावं, याचं स्पष्ट चित्र त्याच्या मनात होतं. आपल्या भावाला त्याने त्याची कच्ची रुपरेषा पाठवली. “चित्रातलं बेडरुम अतिशय शांत, निवांत असेल. त्याच्या भिंती जांभळ्या आणि फरशा लाल दाखवेन. बिछान्याचं लाकूड आणि खुर्च्या लोण्यासारख्या पिवळ्याधम्मक दाखवेन. माझ्या बंद बेडरुममधलं सगळं काही जपानी चित्रासारखं शांत असेल.”

फिंसेंतचं घर त्याचा मित्र गोगेच्या स्वागतासाठी तयार झालं. फिंसेंतचं स्वप्न वास्तवात उतरतंय, असं वाटू लागलं.



ब्रशने रंगाचे लगद्यासारखे जाड फटकारे मारले तर त्याला “इम्पॅस्टो” शैली म्हणतात. फिंसेंतला ही शैली पसंत होती. यामुळे चित्राला खोली, पोत आणि जिवंतपणा मिळतो, असं त्याला वाटे. कधीकधी तो ट्यूबमधील रंग चाकूवर घेऊन चित्र रंगवत असे तर कधी थेट ट्यूब दाबून चित्रामध्ये रंग भरत असे.

दोन खुर्च्या

पल गोगे अर्ल्समध्ये आला तेव्हा फिंसेंतला फार आनंद झाला. त्याला आपल्या या मित्राला रात्रीचे कॅफे, रोमन संस्कृतीचे अवशेष, हिरवेगार बगीचे असं बरंच काही दाखवायचं होतं.

ते पानगळीचे दिवस होते. रात्र लवकर होत असे. फिंसेंत आणि गोगे रात्री उशीरापर्यंत गप्पा मारत. सुरुवातीला सगळं ठीकठाक चाललं होतं. दोघांमध्ये काही मतभेद जरूर होते. पण ते काही अनपेक्षित नव्हतं.



फिंसेंतने एकदा आपल्या मित्रांना अभिमानाने सांगितलं, “गोगेने माझं चित्र काढलंय. त्यात त्याने वेगळीच कल्पना लढवलीय. मला सूर्यफुलांसोबत दाखवलंय....पण.....”. फिंसेंतच्या चेहऱ्यावर नाराजी पसरली, “मी चित्रात काहीसा वेडगळ वाटतोय.”

फार पूर्वी लंडनमध्ये पाहिलेलं एक चित्र फिंसेंतला आठवलं. त्यात चार्ल्स डिकन्सची रिकामी खुर्ची कोरली होती. किती साधीसरळ कल्पना! पण त्या चित्रात खूप अर्थ दडला होता.

“मी आणि गोगे किती भन्नाट आहोत, हे मी जगाला दाखवून देईन,” फिंसेंतने म्हटलं.



प्रथम त्याने सुतळीने बनलेल्या स्वतःच्या साध्या लाकडी खुर्चीचं चित्रं काढलं. ही खुर्ची प्रसन्न पिवळ्या रंगात त्याने रंगवली. खुर्चीवर एक चिरूट दाखवली. मग त्याने गोगेची शोभिवंत लाल खुर्ची रंगवली. या खुर्चीचे हात वक्राकार होते. या खुर्चीवर त्याने पुस्तकं आणि पेटती मेणबत्ती दाखवली.

यानंतर फिंसेंत आणि गोगेमधील संबंध ताणले गेले. लहानसहान बाबींवर त्यांच्यात मतभेद होऊ लागले. हळूहळू त्यांच्यातील कलह विकोपाला गेला.



"तू घाईघाईत कसंतरी रंगवतोस आणि तुला पिवळ्या रंगाचा जास्तच लळा आहे," गोगे तक्रार करू लागला. फिंसेंतची खोली अव्यवस्थित आणि अस्वच्छ असे. गोगेला ते पसंत नसे.

"तू सतत नाविन्य शोधत असतोस. तूझा तुझ्या स्मृतीवर अति विश्वास आहे आणि तुला लाल रंगाचा जास्तच लळा आहे," फिंसेंतने आपल्यावरील टिकेला प्रत्युत्तर दिलं.

"तुला त्याचा त्रास होत असेल तर मी घर सोडून निघून जातो," गोगे गुरगुरला.

फिंसेंतचं हृदय धडधडू लागलं, "नाही, आपण टीम म्हणून काम करायचं ठरवलंय. तू सोडून गेलास तर माझ्या दक्षिणेतल्या स्टुडिओचं काय होईल? तू जाऊ शकत नाहीस."





"मी चाललो," असं म्हणून गोगे बाहेर पडला.

फिंसेंतला आजुबाजुचं जग विखुरत चालल्यागत वाटलं. "सगळे मला सोडून चाललेयत. थिओ लग्न करतोय. आता गोगे सोडून गेला. इतकंच काय, माझं स्वप्नसुद्धा क्षीण होत चाललंय," फिंसेंतच्या मनात आलं.





फिंसेंतला टेबलवर एक चाकू चमकताना दिसला. त्याने झडप घालून तो ताब्यात घेतला. “मी या साऱ्यांना दु:ख देईन,” म्हणत तो ओरडू लागला. मग चवताळून त्याने आपल्या डाव्या कानाचा तुकडा कापून टाकला.

दारावर पोस्टमन आला तेव्हा त्याला फिंसेंतच्या कानातून खूप सारं रक्त वाहून गेल्याचं दिसलं. फिंसेंतला हॉस्पीटलमध्ये घेऊन जावं लागलं. फिंसेंतचं, पिवळ्या घराचा स्टुडिओ बनवण्याचं स्वप्न अपुरंच राहिलं.



आयुष्यभर फिंसेंतने पुस्तकं वाचण्याचा छंद जोपासला. चार्ल्स डिकन्स हे त्याचे आवडते लेखक होते. ‘डेव्हिड कॉपरफिल्ड’ सारख्या कथांमध्ये भरपूर संघर्ष आहे. पण त्यात गरीबीसारख्या संवेदनशील विषयालाही हात घातला होता. फिंसेंतला या कथेचं बरंच कौतुक होतं. जेव्हा त्याने लुक फिल्डेसचे ‘द एम्प्टी चेअर’ पुस्तक पाहिलं तेव्हा त्याने स्वत:साठी ते विकत घेतलं.

हॉस्पीटलचा बगीचा

थिओ आपल्या भावाला बघण्यासाठी धावतपळत हॉस्पीटलमध्ये आला. जानेवारीपर्यंत फिंसेंतची तब्येत बरीच सुधारली. मग तो स्वत:चं एक देखणं चित्र काढू लागला. आजसुद्धा हे चित्र आपल्याला पाहायला मिळू शकतं. यात फिंसेंत खूप शांत दिसतो. त्याच्या चेहऱ्यावरील सफेद मलमपट्टी कलारसिकांना त्याच्या वेदनांचं स्मरण करून देतात.

तो पुन्हा सूर्यफुलांचे गुच्छ रंगवू लागला. पण अर्ल्सच्या काही लोकांना त्याची भीती वाटू लागली.

“तो वेडा माणूस आहे. त्याने स्वत:वरच चाकूने वार केले. आता तो कुणावर वार करेल?” लोक कंड्या पिकवू लागले. यामुळे फिंसेंत जवळच्या सेंट रेमी प्रांतातील हॉस्पीटलमध्ये दाखल झाला.



हॉस्पीटलच्या वातावरणात सुरुवातीला फिंसेंतला खूप भय वाटलं. तेथील रुग्णांचे चेहरे भावनाशून्य होते. त्यांच्या हातांचे स्पर्श निर्जीव होते. स्वतःला दुःखात गुरफटून घेण्याशिवाय आणखी काही काम त्यांना येत नव्हतं.

पण फिंसेंत कधीही दीर्घ काळ रिकामा बसणाऱ्यांतला नव्हता. त्याला डॉक्टरांमध्येच मित्र मिळाले. जंगलामध्ये व हिरव्यागार बगीचामध्ये मनाला शांती मिळाली. लवकरच त्याने निळ्या रंगांची बुब्बुळं, वाकडीतिकडी ऑलिव्हची झाडं, नागमोड्या हिरव्या ज्वाळांसारखी उंच सुरुची झाडं यांची चित्रं काढली.





"फिंसेंतला एखाद्या सुंदर गोष्टीतून स्फूर्ती मिळेल, असं मला वाटतं," थिओ आपल्या नव्या पत्नीला, जोहानाला म्हणाला, "मी त्याला त्याच्या आवडत्या चित्रांच्या काही प्रती पाठवतो. त्याला गुस्ताव डोअरची काळ्या-पांढऱ्या रंगातली कोरीव चित्रं आणि मिलेटची शेतात काम करणाऱ्या लोकांची चित्रं खूप आवडतात."

थिओकडून आलेली ही चित्रं पाहून फिंसेंतला खूप आनंद झाला. तो म्हणाला, "मी अशाच पद्धतीची चित्रं काढेन. पण मी त्यांना जिवंत करेन. त्यांच्यात पोत भरेन, भरपूर रंग ओतेन."





हॉस्पीटलच्या खिन्न चार भिंतिमध्ये फिंसेंतने इतर चित्रकारांच्या चित्रांना जिवंत केलं. त्याने स्वत:ही काही नवी चित्रं रंगवली. “फार वर्षांपासून मला मध्यरात्रीचं आभाळ रंगवायचं होतं. आता माझ्याकडे रंग आहेत आणि वेळसुद्धा!” हॉस्पीटलच्या बगीच्यात उभं राहून तो स्वत:शीच बडबडला.

उत्साहाने त्याने चित्रं रंगवण्यास सुरुवात केली. *द स्टारी नाइट* हे चित्र रंगवून पूर्ण झाल्यावरच त्याने रंगाचा ब्रश खाली ठेवला.

ब्रश खाली ठेवल्यावर त्याने स्मित केलं. भोवऱ्यागत प्रकाशरचना आणि उंचच उंच झाडांमुळे त्याचं चित्रं रुक्ष आणि रोमांचक वाटत होतं. चित्रात आभाळाखाली गावातील घरं आणि चर्चचा मनोरा दिसत होता. ते पाहून त्याला नेदरलँडमधील बालपणीच्या घराची आठवण झाली.

लवकरच तो त्याच्या आजारपणातून मुक्त होईल आणि बाहेरच्या जगात स्वतंत्रपणे जगू शकेल, अशी आशा वाटू लागली.



फिंसेंतला आपल्या आवडत्या चित्रकारांच्या चित्रांची नक्कल करायला खूप आवडे. त्याला मिलेटची चित्रं पसंत होती. कारण त्या चित्रांमधील माणसं गरीब दिसली तरी खूप स्वाभिमानी आणि प्रतिष्ठित वाटत. त्याला डोअरची चित्रंसुद्धा आवडत. कारण त्याच्या चित्रांमध्ये इमारती व सुंदर देखाव्यांऐवजी तुरुंग कोठड्या व मलिन रस्ते रंगवलेले असत.



"फिंसेंत! तू कल्पना करू शकतोस, मी काय बातमी आणलीय!" थिओ फिंसेंतला भेटायला सेंट रेमीमध्ये आला. "अल्बर्ट ऑरियर नावाच्या व्यक्तिने तुझी काही चित्रं पाहिली. ती त्याला अद्भुत वाटली. त्याने त्यावर छान समीक्षाही लिहिलीय. बघ फिंसेंत, आता तू प्रसिद्ध होत चाललायस."

फिंसेंतने मान हलवली, "हा अल्बर्टचा दयाळूपणा आहे. प्रदर्शनात माझ्या चित्रांपेक्षा चांगल्या दर्जाची चित्रंसुद्धा आहेत."

तरीही ती बातमी फिंसेंतची उमेद वाढवणारी होती. आणखीही काही चांगल्या बातम्या येणार होत्या. काही आठवड्यांनंतर, थिओला मुलगा झाला. "माझ्या प्रिय जोहानाने एका गोंडस मुलाला जन्म दिलाय," थिओने फिंसेंतला लिहिलं, "दोघा मायलेकरांची तब्येत ठीक आहे."



फिंसेंतला भय होते की जोहाना त्याच्या आणि थिओच्या नात्यात दरी निर्माण करेल. पण जोहाना फार प्रेमळ, समंजस व मोठ्या मनाची होती. तिने आणि थिओने त्यांच्या मुलाचं नाव निवडलं - फिंसेंत.




हे ऐकून फिंसेंतला फार आनंद झाला. “ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. माझा हा छोटा पुतण्या सदोदीत सुखात राहो. जोहानाला स्वतःची काळजी घ्यायला सांग. खाण्यापिण्याकडे लक्ष द्यायला सांग,” फिंसेंतने थिओला लिहिलं.

फिंसेंत पुन्हा मानसिक आजाराने ग्रस्त झाला. पण मार्च महिन्यात काही आशादायक घडलं.

“मी तुझं एक चित्रं विकलंय,” थिओने अत्यानंदाने भावाला लिहिलं, “तू अर्ल्समध्ये रंगवलेलं *रेड वाईनयार्ड* हे चित्र विकलं गेलंय. आता लवकरच तू श्रीमंत होशील.”

फिंसेंतला आता बरं वाटू लागलं. मे महिन्यात तो हॉस्पीटलमधून बाहेर पडला. तात्काळ तो आपल्या तान्ह्या पुतण्याला बघायला पॅरिसला गेला.



"फिंसेंत!" जोहाना आनंदाने किंचाळली, "तू तर थिओपेक्षा जास्त निरोगी आणि मजबूत दिसतोयस!"

फिंसेंत भावाच्या घरी गेला तेव्हा खूप आश्चर्यचकित झाला. तिथे सर्वत्र त्याने रंगवलेली चित्रंच दिसत होती. *द पोटॅटो इटर्स, लॅंडस्केप्स फ्रॉम अर्ल्स, ब्लॉसमिंग ऑर्चार्ड्स* या चित्रांनी भिंत सजली होती. बरीचशी चित्रं पलंगाच्या खाली आणि फर्निचरच्या मागे ठेवली होती. जोहानाने आपल्या दीराला ते घर स्वतःचंच वाटेल अशी तजवीज केली होती.





तरीही तीन दिवसांनी फिंसेंत त्या भरल्या घरातून बाहेर निघाला. त्याला त्याचा स्वतःचा मार्ग शोधायचा होता. तो आता उत्तरेला ऑव्हर्सुरॉईज नावाच्या शहरात गेला. तिथे त्याचा डॉक्टर मित्र पॉल गॅशेत राहात होता. तो फिंसेंतवर उपचार करणार होता.




काही लोकांच्या मते, फिंसेंतने त्याच्या जीवनकाळात फक्त एकच चित्रं विकलं. कदाचित त्याची इतर चित्रं थिओने विकली असावीत. एका वृद्धाने फिंसेंतच्या *द हेग* या चित्राच्या बारा प्रती खरेदी केल्या. फिंसेंत आपली चित्रं विकून कर्ज चुकवत असे. पण थिओने उदारहस्ते केलेल्या पैशाच्या मदतीविना फिंसेंतला यश मिळू शकलं नसतं.

व्हीटफिल्ड्स विद क्रोज

फिंसेंतला काय समस्या होती? कदाचित तो खूप थकला होता. कदाचित त्याला फेफरं येण्याचा आजार असावा. हा आजार आकस्मिक हल्ला करतो आणि उन्हाळ्यातील वादळवाऱ्यासारखा पटकन गायब होतो.

कुणी ठामपणे हे सांगू शकत नाही. फिंसेंतने आपल्या नव्या घरात पूर्वीपेक्षा जास्त मेहनत केली. "मी दररोज एक चित्र रंगवतोय. एक क्षणही मी वाया घालवत नाहिए," त्याने थिओला लिहिलं.



डॉ. गॅशेत मला वडिलांसारखे आहेत. ते माझ्या कामाचं कौतुक करतात. मी त्यांचं चित्र बनवावं, अशी त्यांची इच्छा आहे. चित्रात त्यांना मी दयाळू आणि चिंतनशील दाखवेन. त्यांना त्यांची आवडती टोपीसुद्धा घालायला सांगेन.

थिओ आणि जोहाना आपल्या मुलासोबत ऑव्हरला गेले तेव्हा फिंसेंत स्टेशनवर एक अमूल्य भेट घेऊन उभा होता. "ही बघ गंमत! माझ्या प्रिय पुतण्यासाठी पक्ष्यांचं घरटं आणलंय मी." मग तो छोट्या फिंसेंतला डॉ. गॅशेत यांच्या बागेत घेऊन गेला. तिथे एक भयानक कोंबडा पाहून ते मूल घाबरलं आणि रडू लागलं.





पण पुन्हा गोष्टी हाताबाहेर जाऊ लागल्या. “माझं डोकं सतत गरगरतं. तुम्ही लवकरात लवकर येऊन मला भेटून जा,” त्याने थिओ आणि जोहानाला लिहिलं. पण ती दोघं आपल्या कामात व्यस्त होती. शिवाय थिओसुद्धा आजारी होता.

“आता मला पूर्वीपेक्षा जास्त कष्ट केलं पाहिजे. प्रत्येक मोकळा क्षण मी भरून काढला पाहिजे,” फिंसेंत स्वत:शीच बडबडू लागला. शक्य होताच तो बाहेर जाऊन ऑव्हरमधील गव्हाच्या शेतांचं चित्र काढत बसू लागला..

“इथलं आभाळ करडं आहे,” फिंसेंतने आपल्या कुटुंबियांना लिहिलं. अर्ल्समधला स्वच्छ, मोकळा सूर्यप्रकाश त्याला इथे दिसत नव्हता. त्याचं नैराश्य ढगांसारखं वाढत गेलं. याचा परिणाम म्हणून की काय, तेथील स्थानिक चर्चचं चित्र काढताना त्याने त्यात गडद आणि उदास रंग वापरले.

शेवटी, हे सारं त्याला असह्य झालं. भोवळ आलेल्या अवस्थेत चालतचालत तो शहरातून एका मक्याच्या शेतात गेला. तिथे त्याने स्वत:च्या पोटात बंदुकीची गोळी मारून घेतली. तो तिथे लगेच मेला नाही. त्याला त्याच्या बेडरूममध्ये नेण्यात आलं. दोन दिवस तो अत्यंत वाईट अवस्थेत होता. थिओच्या कुशीत त्याला मरण आलं. त्याच्या कपड्यांमध्ये त्याने लिहिलेली एक चिठ्ठी मिळाली. त्यात लिहिलं होतं,

“मला वाटतं, मी माझ्या कामासाठी माझा जीव धोक्यात घालतोय.....”



फिंसेंतने चित्रं काढण्यासाठी आपलं सर्वस्व दिलं. त्याचं सर्वात प्रसिद्ध आणि सर्वात शेवटचं चित्र होतं - *व्हीटफिल्ड्स विद क्रोज.* या चित्रात त्याने, वाऱ्याच्या झोतावर झुलणारं पिवळं गवत आणि उदासवाण्या आभाळातून त्यांच्यावर झडप घालणारे काळे गडद पंख दाखवले.

फिंसेंतचा मृत्यू झाला तेव्हा तो फक्त 37 वर्षांचा होता. त्याच्यानंतर केवळ सहाच महिन्यात थिओचाही मृत्यू झाला.



दोघा भावांचं दफन शेजारीशेजारी केलं. पण आजही दोघांचं अस्तित्व जाणवतं ते जोहानाने त्यांच्याबद्दल लिहिलेल्या कहाण्यांमधून, दोघा भावांनी एकमेकांना लिहिलेल्या पत्रांमधून आणि जगभरची कलादालनं मिरवणाऱ्या फिंसेंतच्या लखलखीत, नाट्यमय चित्रांमधून!





फिंसेंतचे अनेक जुने मित्र त्याच्या अंतिम संस्कारसमयी उपस्थित होते. यात पॅरिसचे चित्रकारही सामील होते. त्यांनी फिंसेंतच्या कबरीवर सूर्यफुलं पसरली. भावाच्या पलंगाखाली पडून राहिलेल्या चित्रांचा हा निर्माता आज जगातील एक महान चित्रकार म्हणून ओळखला जातो.

कधीकाळी नापसंत शिक्का असलेली त्याची चित्रं आज लाखो डॉलरना विकली जातात. जगभरातील कलादालनं फिंसेंतची दृष्टी आणि आनंदी सूर्यफुलांनी उजळून निघाली आहेत.

फिंसेंत फान घो याचा वारसा

फिंसेंतच्या मृत्यूनंतर जोहानाने त्याची पत्रं आणि चित्रं सांभाळून ठेवली. एक ना एक दिवस जगाला त्याची महानता कळेल, असा तिला विश्वास होता. तिचा विश्वास सार्थ ठरला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला फिंसेंतचं नाव प्रसिद्ध झालं आणि त्याच्या चित्रांना उत्कृष्ट कलाकृतीचा दर्जा मिळाला.

कालांतराने, शाळा-महाविद्यालयांतून फिंसेंतच्या चित्रांचा अभ्यास होऊ लागला. त्याच्या असामान्य जीवनावर नाटक, सिनेमा, टेलीव्हीजन कार्यक्रम बनू लागले. डॉन मॅक्लिन याने *फिंसेंत* या गीतातून त्याच्या प्रतिभेचा गौरव केला.

आजही फिंसेंतच्या कामाची प्रशंसा केली जाते आणि त्याची चित्रं लाखो डॉलरमध्ये विकली जातात. त्याच्या चित्रांचा सर्वात मोठा संग्रह ॲमस्टरडॅम येथील फान घो संग्रहालयात पाहायला मिळतो. त्याचं *द यलो चेअर* हे चित्र लंडनच्या राष्ट्रीय कलादालनात आहे.

अनेक कलादालनांमध्ये आणि भेटवस्तुंच्या दुकानांमध्ये आपण फिंसेंतच्या चित्रांच्या प्रती खरेदी करू शकतो. कदाचित, *आनंदी सूर्यफुले* हे त्याचं सर्वात लोकप्रिय चित्र आहे. अर्ल्समधील आशेने भारलेल्या पिवळ्या घरात त्याने हे चित्र रंगवलं होतं.

कालक्रम

1853, मार्च 30 रोजी नेदरलँडमधील ग्रूट झुंडर्ट शहरात थिओडोरस फान घो आणि ॲना कार्नेलिया कार्बस या दांपत्याघरी फिंसेंतचा जन्म झाला.

I857, 1 मे रोजी थिओ फान घो याचा जन्म झाला.

1869 नेदरलँडमधील हेग येथील गुपील अँड सन्स या कलाविक्रेत्याकडे फिंसेंत काम करू लागला.

1872 फिंसेंतने थिओला पत्रं लिहिण्यास सुरूवात केली.

1873 फिंसेंतला कामासाठी लंडन येथे पाठवण्यात आलं.

1876 फिंसेंतने गुपील अँड सन्सची नोकरी सोडली.

1877 फिंसेंत ॲमस्टरडॅम येथे धर्माचा अभ्यास करू लागला.

1878 फिंसेंत बेल्जियममधील बोरिनेज येथे गेला.

1880 चित्र काढण्यास सुरुवात.

1885 *द पोटॅटो इटर्स* हे चित्र रंगवलं.

1886 जानेवारी, अँटवर्पमध्ये चित्रकलेचा थोडक्यात अभ्यास.

फेब्रुवारी, फिंसेंत थिओसोबत राहाण्यासाठी पॅरिस येथे गेला.

थिओने त्याला "इंप्रेशनिस्ट" चित्रकारांच्या प्रदर्शनात नेलं.

1888 फिंसेंत अर्ल्समध्ये फिरला. "यलो हाऊस"मध्ये राहिला. पल गोगेही फिंसेंतसोबत राहिला. फिंसेंत व पलमध्ये कलह. फिंसेंतने स्वत:चा कान कापून घेतला.

1889 फिंसेंतने आपलं सर्वात प्रसिद्ध *सूर्यफूल* हे चित्र पूर्ण केलं. थिओने जोहाना बोंगरशी लग्न केलं

1890, जुलै 29 रोजी थिओच्या कुशीत फिंसेंतचा मृत्यू.

1891, 25 जानेवारी रोजी थिओ फान घो याचा मृत्यू.

फिंसेंत फान घो

फिंसेंत फान घो याला चित्रं काढायला खूप आवडत असे. पण कुणालाही त्याची चित्रं पसंत पडत नसत. आपली चित्रं लोकप्रिय व्हावीत, असं त्याला खूप वाटे. पण चित्र काढणं हीच त्याच्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट होती. त्याने अनेक चित्रं काढली. अगदी गव्हाची शेतं, झाडं, चमकदार पिवळी सूर्यफुलं यांचीही चित्रं त्याने काढली.

फान घो हा एक उत्कृष्ट चित्रकार होता. जगातील महान चित्रकारांमध्ये त्याची गणना होते. त्याच्या चित्रांना उत्कृष्ट कलाकृतीचा दर्जा दिला जातो. त्याची चित्रं लाखो डॉलरना विकली जातात. हे पुस्तक अशा महान चित्रकाराची कहाणी विशद करते.